महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३७१६ E Mail:dol1cell.rfd@maharashtra.gov.in

क्रमांक : बैठक-२०२५/प्र.क्र.६३/ल-१ दिनांक : ११ मार्च २०२५.

प्रति,

१. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. जमांबदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महा. राज्य, पुणे.
५. सर्व जिल्हाधिकारी.
६. उप सचिव (ज-१अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप सचिव (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय : मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यातील सर्व शिव पाणंद शेतरस्ते खुले करून हद्द निश्चित करणेबाबत झालेली बैठक.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०६.०२.२०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीचे इतिवृत्त पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी यासोबत जोडले आहे.

आपला,

(सही)

(प्रतापसिंह खरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत: वरीलप्रमाणे

प्रत,

निवडनस्ती (ल-१).

C:\Users\Balasaheb.Darade\Desktop\Rahul\Meetings & Minutes\पाणंद रस्ते\Draft.docx

**विषय:- महाराष्ट्र राज्यातील सर्व शिव पाणंद व शेत रस्ते खुले करून हद्द निश्चिती करणेबाबत.**

विषयाधीन प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली गुरूवार, दि. ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी दुपारी ०३.३० वा. बैठक पार पाडली. सदर बैठकीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी/प्रतिनिधींचे नाव | पदनाम व विभाग |
|---|---|---|
| १. | श्री. गणेश पाटील | सचिव, रोजगार हमी योजना विभाग. |
| २. | श्री. अतुल कोदे | सह सचिव, रोजगार हमी योजना विभाग. |
| ३. | श्री.संजय बनकर | सह सचिव, महसूल व वन विभाग. |
| ४. | श्री.प्रशांत पाटील | उप सचिव, ग्राम विकास. |
| ५. | श्री.सत्यनारायण बजाज | उप सचिव, महसूल व वन विभाग. |
| ६. | श्री. मिलिंद श्रीपती पाटील | संस्थापक अध्यक्ष |
| ७. | ॲड. प्रकाश साबळे | पदाधिकारी |
| ८. | श्री. धैर्यशील ढमढेरे | पदाधिकारी |
| ९. | श्री. संजय देवकुळे | पदाधिकारी |

२. उपरोक्त विषयी सदर बैठकीत सांगोपांग चर्चा करण्यात आली. चर्चेच्या अनुषंगाने मा. अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र | निवेदनातील मुद्दा | मा.मंत्री महोदयांचे निर्देश | संबंधित विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | राज्यातील सर्व शिव पाणंद शेतरस्त्याच्या हद्दी निश्चिती करून समृध्द गावांसाठी दर्जेदार शेतरस्ते तयार करावेत. | राज्यातील सर्व शिव पाणंद शेतरस्त्याच्या हद्दी निश्चिती करून समृध्द गावांसाठी दर्जेदार शेतरस्ते तयार करण्यासाठी नागपूर पॅटर्नचा अभ्यास करावा. तसेच रोजगार हमी योजना व ग्राम विकास विभागाचे अभिप्राय घेवून कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. | महसूल व वन विभाग (ज-१अ), ग्राम विकास व पंचायत राज विभाग, रोजगार हमी योजना विभाग व जिल्हाधिकारी, नागपूर. | ३ महिने |
| २. | राज्यातील सर्व तहसिल कार्यालयांमधील प्रलंबित शेत रस्ता केसेस निकाली काढण्याचा तातडीने आदेश द्यावा. | राज्यातील सर्व तहसील कार्यालयांना महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी विचारात घेवून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेबाबत शासन स्तरावरून आदेश देण्यात यावेत. | महसूल व वन विभाग (ज-१अ) | २ दिवस |
| ३. | चालू वहिवाटीच्या प्रत्येक शेतरस्त्याचे सर्वेक्षण करून त्यांच्या नोंदी गाव नकाशावरती घेण्यात याव्यात. | राज्यातील सर्व शेतरस्त्यांचे सर्वेक्षण करून त्यांच्या नोंदी गाव नकाशावरती घेण्याबाबत जमाबंदी आयुक्तांनी तातडीने कार्यवाही करून शासनास अहवाल सादर करावा. | महसूल व वन विभाग (ल-१), जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे व सर्व जिल्हाधिकारी | ३ महिने |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत. | शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी कारवाई करावी. तसेच गृह विभागाशी विचार विनिमय करून शासन स्तरावरून सर्व पोलीस अधीक्षकांना सूचना देण्याबाबत विनंती करावी. | महसूल विभाग (ज-१अ) व गृह विभाग, सर्व जिल्हाधिकारी | ३ महिने |
| ५. | मा.उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर येथे पारनेर तालुक्यातून दाखल याचिका क्र.८२८७/२०२३ रोजीच्या निकालानुसार ६० दिवसांच्या आत शेतरस्ता खुला करून देण्यासंदर्भातील निकालाच्या धर्तीवर राज्यातील तहसिल कार्यालयांना तातडीने आदेश द्यावेत. | मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत महसूल विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत. | महसूल व वन विभाग (ज-१अ) व सर्व जिल्हाधिकारी | ८ दिवस |
| ६. | शासन निर्णयाप्रमाणे नकाशावरील पांदण / शिव पाणंद / सार्वजनिक वहिवाटीचे रस्ते / शेतरस्त्यांच्या मोजणीस पोलीस संरक्षण फी बंदची अंमलबजावणी करण्यात यावी. | शेत रस्त्यांच्या मोजणीस पोलीस संरक्षण फीबाबत जमाबंदी आयुक्त यांनी शासनास प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव गृह विभागास पाठवावा. | जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख व गृह विभाग व महसूल विभाग (ल-१) | ३ महिने |
| ७. | शिव, पाणंद शेतरस्त्यांच्या नंबरीचे सर्वेक्षण करून नंबरी हटवणाऱ्यांना दंडात्मक कार्यवाही करावी. | शिव पाणंद शेत रस्त्याच्या हद्दीच्या निशाण्याचे परिरक्षण व दुरूस्तीच्या जबाबदारीबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.भुमापन-१०८६/६८/४९६६/ल-१, दि.०४.११.१९९७ प्रमाणे कार्यवाही करावी. | महसूल विभाग (ल-१) व सर्व जिल्हाधिकारी. | ३ महिने |
| ८. | तहसिल कार्यालयामार्फत दिलेल्या शेतरस्त्यांच्या निकालाच्या अपिलानंतर मा. प्रांत साहेबांनी स्वत: अथवा आपल्या अधिकाऱ्यांमार्फत स्थानिक चौकशी करून आपल्याच कार्यालयामार्फत सदर शेतरस्त्याचा अंतिम निकाल द्यावा. तो अर्ज पुन्हा पुनरावलोकनासाठी | सदर प्रक्रिया ही अर्धन्यायिक स्वरूपाची असल्याने याबाबत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदीनूसार संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. | महसूल विभाग (ज-१अ) व सर्व जिल्हाधिकारी. | ३ महिने |

Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तहसिल कार्यालयाकडे पाठविणे बंद करावे. | | | |
| ९. | महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीची दखल श्रीगोंदा तहसिल कार्यालयाकडून विशेष सहकार्य लाभत असून राज्याला मॉडेल म्हणून या ठिकाणी भूमी अभिलेख कार्यालयासह महसूलाच्या कर्मचाऱ्यांचा असणारा तुटवडा दूर करावा. | श्रीगोंदा तहसिल कार्यालयाने राबविलेल्या मॉडेलबाबतची सविस्तर माहिती शासनास पाठवावी. ती तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी. | महसूल व वन विभाग (ज-१अ) व रोजगार हमी योजना विभाग. | ३ महिने |
| १०. | वाटपपत्रात शेतरस्त्याचा उल्लेख झाल्याशिवाय वाटपपत्र मंजूर करण्यात येऊ नये. | महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ मधील तरतूदीनुसार संबंधित तहसिलदारानी वाटप पत्राच्या आदेशात शेत रस्त्याचा उल्लेख करावा | महसूल वन विभाग (म-१) व सर्व जिल्हाधिकारी | ३ महिने |

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

*************************************

Scanned with OKEN Scanner